# घटक – राज्यमंत्रिमंडळ

## घटनात्मक तरतूदी

**कलम १६३ →**
i) राज्यपालाला कार्य करण्याबाबत सल्ला देण्यासाठी – मंत्रिमंडळ
ii) मंत्र्यांनी राज्यपालाला दिलेल्या सल्ल्याबाबत कोणतीही न्यायालयीन चौकशी करू शकत नाही.
iii) राज्यपालांच्या विवेकाधिकाराच्या कृतीस आव्हान देता येणार नाही.

**कलम १६४ ⇒**
i) राज्यपाल मुख्यमंत्र्याची व त्याच्या सल्ल्यानुसार इतर मंत्र्यांची नियुक्ती करील. (छत्तीसगढ, झारखंड, म.प्रदेश, ओडीशा या राज्यात एक आदिवासी कल्याणासाठी मंत्री असणे आवश्यक – ९४ वी घ.दु. २००६ ने बिहार या राज्यांतून वगळण्यात आले)
ii) मुख्यमंत्र्यासहित राज्याच्या मंत्रिमंडळातील सदस्यांची संख्या त्या राज्याच्या विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या १५% पेक्षा जास्त असता कामा नये (परंतु मुख्यमंत्री धरून ही संख्या १२ पेक्षा कमी असता कामा नये.)
घ.दु. – ९१ वी – २००३
iii) कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य पक्षांतर विरोधी कायद्यामुळे अपात्र ठरल्यास तो मंत्री म्हणून नियुक्त होण्यास अपात्र ठरतो. (घ.दु. ९१ वी – २००३)
iv) मंत्र्यांचा कार्यकाल राज्यपालांच्या मर्जीनुसार
v) मंत्रिमंडळ राज्य विधानसभेला उत्तरदायी
vi) मंत्र्यांना शपथ राज्यपालाकडून
vii) राज्य विधिमंडळाचा सलग सहा महिने सदस्य नसलेला मंत्री पदावर राहणार नाही
viii) राज्य विधिमंडळ मंत्र्यांचे वेतन व भत्ते ठरवील.

**कलम १६६** – राज्य सरकारचे कामकाज चालविणे.
i) राज्य सरकारच्या सर्व कृती राज्यपालांच्या नावाने
ii) मंत्र्यामध्ये कामकाज वाटून देण्यासाठी राज्यपाल नियम करतो.

**कलम – १६७** – मुख्यमंत्र्यांची कर्तव्ये
i) राज्याच्या कामकाजाच्या प्रशासनासंबंधी मंत्रिमंडळाचे सर्व निर्णय आणि कायद्याचे प्रस्ताव राज्यपालाला कळविणे.
ii) तसेच राज्यपाल त्या संदर्भात मागेल ती माहिती राज्यपालाला देणे.
iii) एखाद्या बाबी विषयी मंत्र्याने निर्णय घेतला आहे पण त्यावर मंत्रिमंडळाने विचारविनिमय

Scanned by CamScanner

केला नसेल तर राज्यपालाने सांगितल्यास अशा बाबी मंत्रिमंडळाच्या विचारार्थ ठेवणे.

कलम १७७ - सभागृहासंदर्भात मंत्र्यांचे अधिकार:

प्रत्येक मंत्र्यास विधान सभेच्या आणि विधानपरिषदेच्याही (असेल तर) आणि तो सदस्य असलेल्या राज्य विधिमंडळाच्या कोणत्याही समितीच्या कामकाजात भाग घेण्याचा व बोलण्याचा अधिकार असतो.

मंत्र्यांच्या सल्ल्याचे स्वरूप:

→ राज्यपालाच्या विवेकाधिकारात येणाऱ्या बाबी वगळता इतर बाबींसंदर्भात मंत्रीमंडळ राज्यपालास सल्ला देते (कलम १६३)

→ मंत्र्यांनी राज्यपालाला दिलेल्या सल्ल्याची कोणतेही न्यायालय चौकशी करू शकत नाही.

→ विधानसभा विसर्जित झाल्यानंतरही नवीन मंत्रिमंडळ अस्तित्वात येईपर्यंत सध्याचे मंत्रीमंडळ अस्तित्वात राहते → राज्यपालाला सल्ला देण्यासाठी - १९७१ - सर्वोच्च न्याया.

→ राज्यपालांची एखाद्या विषयासंदर्भात खात्री पटणे म्हणजे व्यक्तिगत खात्री नसून मंत्रिमंडळाची खात्री असा अर्थ आहे.

मंत्र्यांची नियुक्ती:

→ राज्यपाल मुख्यमंत्र्याची नियुक्ती करतो.

→ राज्यपाल इतर मंत्र्यांची नियुक्ती मुख्यमंत्र्याच्या सल्ल्याने करतो.

→ छत्तीसगड, झारखंड, म. प्रदेश, ओडिसा या राज्यात आदिवासी कल्याणासाठी मंत्री असला पाहिजे. (तो SC व OBC च्या संदर्भातील कामे देखील करेल)

→ ९४ वी घ. दु. २००६ ने या यादीतून बिहारला काढले. - कारण बिहारमधून झारखंड बाजूला झाल्यानंतर अनुसूचित जमातीचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण कमी झाले

→ सामान्यतः विधानसभा / विधान परिषदेचा सदस्य मंत्री.
दोन्ही गृहाचा सदस्य नसलेला व्यक्ती जास्तीत जास्त ६ महिने मंत्रीपदावर राहू शकतो. त्या अगोदर तो निवडून / नामनिर्देशीत झाला पाहिजे.

→ एका गृहाचा सदस्य असलेला मंत्री दुसऱ्या गृहात आपले म्हणणे मांडू शकतो आणि कामकाजात सहभागी होवू शकतो परंतु ज्या गृहाचा सदस्य आहे त्याच गृहात मतदान करू शकतो.

Scanned by CamScanner

## मंत्र्यांची शपथ आणि वेतन

⇒ राज्यपाल पदग्रहण करण्यापूर्वी मंत्र्याला शपथ देतात.

⇒ मंत्र्यांचे वेतन व भत्ते राज्य विधिमंडळ ठरवते

## मंत्र्यांची संयुक्त जबाबदारी

→ मंत्रिमंडळ संयुक्तरित्या राज्याच्या विधानसभेला उत्तरदायी असेल (१६४)

→ संघ म्हणून काम करतात - संयुक्तपणे तरतात किंवा बुडतात.

→ अविश्वास ठराव संमत झाल्यास विधानपरिषदेतील मंत्र्यासहीत सर्व मंत्र्यांना राजीनामा द्यावा लागतो (स्वतंत्र राजीनाम्याची आवश्यकता नसते - मुख्यमंत्री राजीनामा)

→ कॅबिनेटच्या निर्णयाला पाठिंबा देणे सर्व मंत्र्यांना बंधनकारक

## मंत्र्यांची व्यक्तिगत जबाबदारी - कलम १६४

→ राज्यपालांच्या मर्जीनुसार मंत्री पदावर

→ केवळ मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानेच राज्यपाल मंत्र्याला मंत्रीपदावरून हटवू शकतो.

→ मुख्यमंत्री मंत्र्याला राजीनामा देण्यास सांगू शकतो.

## कायदेशीर जबाबदारी नाही

⇒ केंद्राप्रमाणे घटनेमध्ये राज्यातील मंत्र्यांच्या कायदेशीर जबाबदारीची पद्धत नाही.

→ सार्वजनिक कृतीसाठी राज्यपालाने काढलेल्या आदेशावर मंत्र्याने स्वाक्षरी करण्याची आवश्यकता नाही.

## मंत्रिमंडळाची संरचना

⇒ घटनेमध्ये मंत्रिमंडळातील सदस्यांची संख्या आणि त्यांचा दर्जा याविषयी काही म्हटलेले नाही — (त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार मुख्यमंत्र्याला)

→ रचना ⇒ केंद्राप्रमाणेच - कॅबिनेट - राज्य - उपमंत्री.

→ उपमुख्यमंत्री ⇒ १९५६ - मध्ये उपमुख्यमंत्री पद
१९६७ — प. बंगाल

सध्या ३१ पैकी १५ राज्ये/केंद्र मध्ये हे पद

आंध्र प्रदेशात - 5, कर्नाटकात 3, उ प्रदेश व गोवा - 2 उपमुख्यमंत्री

(आंध्र, अरुणाचल, बिहार, ~~छत्तीसगड~~, दिल्ली, गोवा, गुजरात, ~~हरियाणा~~, ~~हिमाचल प्र.~~, ~~जम्मू व काश्मीर~~, ~~झारखंड~~, कर्नाटक, ~~केरळ~~, ~~म.प्र~~, ~~महाराष्ट्र~~, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, राज, ता. नाडू, त्रिपुरा, उ.प्र.)

काम - मुख्यमंत्र्याला सहाय्यक म्हणून - घटनेत उल्लेख नाही.

Scanned by CamScanner